ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 8 | APRIL - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# किल्ले वसंतगडावरील अप्रकाशित शिलालेख

प्रा.गौतम गणपती काटकर
कला व वाणिज्य महाविद्यालय,सातारा.



## प्रस्तावना:

मराठयांच्या इतिहासातील एक महत्वाचा किल्ला म्हणून कराड तालुक्यातील तळबीड जवळील वसंतगडाचे स्थान आहे. या किल्ल्यावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. 12 व्या शतकातील हा किल्ला अनेक राजवटींचा साक्षीदार ठरला आहे. तत्कालिन इतिहासाच्या खुणा या किल्ल्यावर आजही आढळतात. त्यापैकीच एक महत्त्वाचा असणारा साक्षीदार म्हणजे किल्ल्याच्या माथ्यावर असणारे चंद्रसेन किंवा चंदोबा देवस्थान होय. अनेक घराण्याचा हा चंदोबा कुलदैवत आहे. या मंदिराच्या जीर्णोध्दारासंबधी असणारा शिलालेख हा प्रस्तुत शोध निबंधचा विषय आहे. या शिलालेखातून तत्कालीन घडामोडीवर व मंदिराच्या जीर्णोध्दारावर प्रकाश टाकण्यात आला आहे. हा शिलालेख अद्याप दुर्लक्षित असल्याने वसंतगडाच्या इतिहासाच्या दृष्टीने तो महत्वाचा ठरणारा आहे.

## भौगोलिक स्थान :

(कराड ता., 17 10′ उ.;74 05′ पू.) कराडच्या वायव्येस कराड – पाटण रस्त्यावर 7.4 कि. मी. वर आहे. पायथ्याशी असलेल्या तळबीड गावावरुन किल्ल्यावर जाण्यास रस्ता आहे. किल्ल्याचे प्रवेशद्वार पूर्वेस आहे. मुख्य प्रवेशव्दाराच्या आत आणखी एक प्रवेशव्दार आहे.[1] वसंतगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या तळबीड गावामुळे याला तळबीडचा किल्ला देखील म्हणतात, तळबीड किल्ल्याप्रमाणेच तळबीड गावालाही अनन्य साधारण महत्व आहे. कारण इतिहासामध्ये शिवाजी महाराजांचे दुसरे सेनापती हंबीरराव मोहिते आणि मराठयांच्या घराण्यातील एक गौरवपूर्ण स्त्री आणि हंबीररावाची कन्या महाराणी ताराबाई यांचे हे गाव आहे.[2]

## ऐतिहासिक महत्व :

वसंतगड हा एक ऐतिहासिक महत्व असलेला भक्कम असा किल्ल आहे. कोल्हापूरचा शिलाहार राजा दुसरा भोज यांने तो 12 व्या शतकात बांधला. शिवछत्रपतीचा आद्य बखरकार कृष्णाजी अनंत सभासद आपल्या किल्ल्याच्या यादीत त्याची गणना करतो. प्रतापगडाच्या युद्दानंतर 1659 मध्ये शिवछत्रपतीनी तो जिंकला. मसूरचे महादजी जगदाळे याच किल्ल्यावर 1699 मध्ये कैदेत होते. राजाराम महाराजांचे वास्तव्य 20 जुलै 1699 रोजी या गडावर होते. त्यांच्या कारकिर्दीत रामचंद्रपंत अमात्य कराड प्रातांचा बंदोबस्त या किल्ल्यावरूनच पहात. पुढे 25 नोव्हेंबर 1699 नंतर हा किल्ला काही काळ औरंगजेबाकडे गेला.[3] 30 नोव्हेंबर 1699 रोजी औरंगजेबाने या किल्ल्याला भेट दिली यावेळी त्याने वसंतगडाचा उल्लेख यापुढे मिफातीहल फतुह(यशाच्या किल्ल्या) असा करण्यात यावा अशी आज्ञा केली.[4]

सन 1708 मध्ये ताराबाईकडून तो शाहूंनी काबीज केला. दिनांक 27 मार्च 1806 रोजी बापू गोखले व पंतप्रतिनिधीची लढाई या गडाखाली झाली होती. यात प्रतिनिधीचा पराभव होऊन त्यास कैद करण्यात आले. सन 1818 मध्ये तो इंग्रजांनी जिंकला.[5]

## चंद्रसेन / चंदोबा मंदिरः

किल्ल्यावरचे मुख्य देवस्थान चंद्रसेन महाराज यांचे मंदिर आहे. यांना चंदोबा सुध्दा म्हणतात. याठिकाणी आख्यायिका अशी सांगतात की, चंद्रसेनाने कठोर तपश्चर्या करून शंकरास प्रसन्न करून घेतले. आणि त्याच्याकडून तलवार प्राप्त केली ती याच ठिकाणी, हा चंदोबा म्हणजे रामायणातील रावणाचा भाचा चंद्रसेन. मंदिराच्या समोरील बाजूस पूर्वी उभे असणाऱ्या दिपमाळाचे चौथरे व दोन दिपमाळा आजही उभ्या आहेत, मंदिराच्या उत्तरेस वाडयाचे असे अवशेष आहेत. याच्या शेजारी मोडकळलेल्या अवस्थेतील शंकर मंदिर आहे. लोकांच्या सांगण्यानुसार गडावर दोन—तीन तोफाही होत्या. त्यापैकी एक तोफ तळबीड गावामध्ये हंबीरावांच्या स्मारकापासी आहे, आणि एक ते दोन तोफा साताऱ्यात आहेत. गडावर पाण्याची तीन मोठी तळी आहेत.[6]

मंदिराच्या बांधणीवर मराठेकालीन स्थापत्यशैलीचा प्रभाव दिसून. व त्याचे खांब दगडी आहेत. चंदोबाची मूर्ती भग्नावस्थेतील आहे. मंदिराच्या आसपास श्री गणेश, महादेव, श्रीराम, लक्ष्मण, सीता, गजलक्ष्मी यांची छोटी मंदिरे आहेत. चैत्र शुध्द नवमीस (रामजन्म) येथे यात्रा भरते. आपल्या कुलदैवताची पूजाअर्चा व दर्शनासाठी तळबीडकर ग्रामस्थ गडावर जात असतात.[7] मंदिरात चंदोबाची मूर्ती आहे, ही मूर्ती हात व पायाचे पंजे नसलेली आहे. मूर्तीचे मस्तक अर्धे व त्यावर शेंडी दिसते. मूर्तीची उंची अडीच फूट, तर तोंड दक्षिणेकडे आहे.[8]

हा चंद्रसेन अनेक घराण्याचा कुलदैवत आहे असल्याने वर्षातून अनेक दिवस दर्शनासाठी भक्तमंडळी वसंतगडावर येतात. मंदिराच्या पूर्वेस असणाऱ्या भिंतीवर देवनागरी लिपीतील एक शिलालेख कोरलेला आहे. हा शिलालेख मंदिराच्या जीर्णोध्दाराशी संबधीत प्रस्तुत शोध निबंधात या अप्रकाशित शिलालेखावर प्रकाश टाकण्यात आला आहे. या शिलालेखातून जीर्णोध्दार कर्ते व त्यासाठी आलेला खर्चाबद्दल माहित मिळते. अव्वल मराठेशाहीतील हा शिलालेख असून मराठाकालिन इतिहासाचा हा एक महत्वाचे साधन ठरणारा आहे.

मंदिरावरील शिलालेखाचे वर्णन :

मंदिराच्या पूर्व बाजूकडील भिंतीवर हा शिलालेख आहे. मंदिराचा मुळ चौथरा जो जमिनीपासून वर असून त्याची उंची 2 फूट 5 इंच आहे, त्यापासून हा शिलालेख 4 फूट 10 इंच उंचीवर आहे. शिलालेखाची लांबी 8 इंच व रूंदी ही 8 इंच आहे. या शिलालेखाच्या एकूण दहा ओळी आहेत. शिलालेखाच्या चार ओळी झाल्यानंतर दोन भाग केलेले आहेत. शिलालेखाची भाषा मराठी असून लिपी देवनागरी आहे. मात्र हा शिलालेख अशुध्द स्वरूपात कोरण्यात आला आहे. हा शिलालेख कोरण्यासाठी छिन्नी हातोडयाचा वापर केलेला दिसून येतो.

### शिलालेखाचा मजकूर :

0|| श्री ||0
चंद्रश्यण
गावकरी व गुरव मढळी याचे पासु
न मकता 975 घेतला

| | |
|---|---|
| आबाजी बीण | बापुजी बीण केदा |
| कीशणाजी राहीक | रबा खुळे गवडी |
| र गवडी राहानार | राहानार राठनीकर |

वसंतगड
शके 1710 रचे सालात जीरणउदार
या दोगाणी केले काम झाले

### आशय :

हा शिलालेख चंद्रसेन देवालयाच्या जीर्णोध्दाराबाबत आहे. या जीर्णोध्दारासाठी दोन गवंडयांनी बांधकामाचा मक्ता घेतला होता. यातील एक गवंडी वसंतगडचा (सध्याचा ता. कराड जि.सातारा) रहिवासी असून

त्याचे नांव आबाजी बीण कीश्नाजी राहीकर असे आहे. दुसरा गवंडी राहटणी ( सध्याचा ता. खटाव जि.सातारा) या गावाचा होता. त्याचे नांव बापुजी बीण केदारबा खुळे गंवडी राठनीकर असे आहे. या दोघांनी मंदिराच्या जीर्णोध्दाराचा मक्ता हा 975 रुपयासाठी घेतला होता. जीर्णोध्दाराचा मक्ता या दोघांनी गावकरी व गुरव मंडळी कडून घेतल्याचा उल्लेख शिलालेखात आहे. जीर्णोध्दाराचे काम शके 1710 झाले. शके 1710 म्हणजेच मोडक जंत्री नुसार हे साल 7 एप्रिल 1788 ते 22 मार्च 1789 या दरम्यान येते.[9] त्यावरून या मंदिराचा जिर्णोध्दार सन 1788 ते 1789 या दरम्यान झाला असल्याचे स्पष्ट होते.

शिलालेख कोरणा—यानी हा शिलालेख अशुध्द भाषेत कोरला आहे. उदा.: ज्या देवस्थानच्या जीर्णोध्दाराबाबत हा शिलालेख आहे. त्या दैवताचे नाव कोरताना तो चंद्रसेन ऐवजी चंद्रश्यण असा कोरला आहे. गवंडी हा शब्द कोरताना गवडी , गुरव मंडळी हा शब्द कोरताना मढळी, मक्ता हा शब्द कोरताना मकता, जीर्णोध्दार हा शब्द कोरताना जीरणउदार तर दोघांनी हा शब्द कोरताना दोगानी असा कोरला आहे. मराठेशाहीच्या इतिहासाचा साक्षीदार असणा—या या गडावर अनेक महत्वाचे अवशेष आहेत. हे अवशेष ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे आहेत. प्रस्तुत शिलालेख व मंदिर हे स्थापत्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. आज पर्यंत हा शिलालेख अप्रकाशित होता. हा शिलालेख अव्वल मराठेशाहीतील आहे. या शिलालेखावरून वसंतगडाच्या 225 वर्षापूर्वीच्या इतिहासावर नवा प्रकाश पडतो. शिलालेखात उल्लेख केलेले गवंडयाचे वंशज आजही मंदिरास भेट देतात व त्यांच्या पूर्वजांनी जिर्णोध्दार केल्याची माहिती सांगतात.[10] शिलालेख हे इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असणारे अव्वल दर्जाचे साधन आहे. त्यामुळे वसंतगडावरील हा प्रस्तुत शिलालेख वसंतगडाच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे साधन ठरणारा आहे.

## संदर्भ :

1. डॉ. पाठक अरूणचंद्र शं. सातारा जिल्हा गॅझेटिअर,प्रकाशक दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2012 पृ.767
2. फडके आदित्य,साता—याच्या मुलखात,स्नेहल प्रकाशन,पुणे,2007 पृ.34
3. माळी विजय श. क—हाड प्रितीसंगमावरच आदितीर्थ,प्रकाशक ग्रंथाली—ज्ञानयज्ञ प्रकाशन, पहिली आवृत्ती,2009 पृ.44
4. पगडी सेतुमाधवराव, अनुवादक संपादक,मोगल दरबारची बातमीपत्रे,प्रकाशक,सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मंत्रालय,मुंबई,प्र.आ.ऑ.1978,पृ.56
5. डॉ.पाठक अरुणचंद शं., सातारा जिल्हा गॅझेटिअर,प्रकाशक दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन,मुबंई, 2012, पृ. 867
6. वसंतगड प्रत्यक्ष भेट. दि.26/09/2014
7. मुलाखतः ताटे नाना विठोबा, चंद्रसेन मंदिराचे गुरव रा. वसंतगड गाव यांची मुलाखत दि 26/09/2014
8. वसंतगड प्रत्यक्ष भेट. दि 26/09/2014
9. मोडक बाळाजी प्रभाकर, शक व सन यांची तिथी व तारीखवार जंत्री , सन 1889
10. मुलाखतः ताटे रामदास गंगाराम, चंद्रसेन मंदिराचे गुरव रा. वसंतगड गाव यांची मुलाखत दि . 26/09/2014